# आम आदमी विमा योजना

१. सदरची केंद्र पुरस्कृत आम आदमी विमा योजना दिनांक २ ऑक्टोबर, २००७ रोजी राबविण्याची घोषणा केली असुन ही योजना ग्रामीण भागातील भूमीहीन लोकांसाठी राबविण्याचे ध्येय्य ठेवण्यात आले होते.

२. दिनांक ८ जुन, २०११ च्या शासन निर्णयानुसार केंद्र पुरस्कृत आम आदमी विमा योजनेकरिता जी व्यक्ती ५ एकर पेक्षा कमी जिरायती व २.५ एकर पेक्षा कमी बागायती शेत जमीन धारण करीत असेल त्या व्यक्तीला भूमिहीन म्हणून गृहीत धरण्यात यावे. परंतु भूमीहीन कुटूंबाची व्याख्या या योजने पुरतीच लागु राहील.

S1

# आम आदमी विमा योजना व विद्यार्थी शिष्यवृत्ती

सदरची योजना ग्रामीण भागातील भुमीहीन कुटुंबातील कर्त्या व्यक्तीस विम्याचे संरक्षण भारतीय आयुर्विमा महामंडळ यांचेकडुन विमा उतरविण्यात येते या विम्याची हप्त्याची संपुर्ण रक्कम शासनामार्फत भरण्यात येते.

**पात्रतेचे निकष, अटी व शर्ती :-** ग्रामीण भागातील भुमीहीन कुटुंबातील १८ ते ५९ वयागटातील रोजगार करणारा कुटुंब प्रमुख

**आर्थिक सहाय्य :-** १. नैसर्गीक मृत्यु रक्कम रुपये ३०,०००/-

२. आपघाती मृत्यु रक्कम रुपये ७५,०००/-

३. आपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास किंवा दोन्ही डोळे किंवा दोन्ही पाय निकामी झाल्यास रक्कम रुपये ७५,०००/-

४. आपघातामुळे एक डोळा किंवा एक पाय निकामी झाल्यास रक्कम रुपये ३७,५००/-

**आवश्यक कागदपत्रे :-** विमा धारक भुमीहीन असल्याचा पुरवा ( पाच एकर पेक्षा कमी जिरायती किंवा अडीच एकरपेक्षा कमी बागायती जमीन धारक )

**विद्यार्थी शिष्यवृत्ती :-** १.आम आदमी विमा योजना धारकाचा पाल्य ९ वी ते १२ वी या इयत्तेत शिकणाऱ्या तिमाही प्रति मुलास रक्कम रुपये ३००/- इतका लाभ दणेत येतो.

२. कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना लाभ दिला जातो.